# वसई-विरार शहर महानगरपालिका
## मालमत्ता कर विभाग

दि.०८/०७/२०२४

**<u>वसई-विरार शहर महानगरपालिकेमार्फत मालमत्ता धारकांना जाहीर करण्यात आलेल्या विशेष सूटला नागरिकांचा उदंड प्रतिसाद!</u>**

महानगरपालिकेमार्फत मुदतीत कर भरणा करणाऱ्या मालमत्ता धारकांना देण्यात येणाऱ्या सुटचा नागरिकांनी मोठ्या प्रमाणात लाभ घेतलेला असून पहिल्या तिमाहीत महानगरपालिकेची मालमत्ता कर पोटी रक्कम रु.८३.३४ कोटी वसुली झालेली आहे. माहे जून २०२४ अखेर पर्यंत १,७६,७६२ इतक्या मालमत्ता धारकांनी कर भरणा केलेला असून त्यापैकी ३७.७०% ऑनलाईन व ६२.३०% ऑफलाईन पद्धतीने कर भरणा केलेला आहे. सन २०२३-२४ या वित्तीय वर्षात ३० जुन २०२३ अखेरपर्यंत ७३.६० कोटी इतका मालमत्ता कर वसूल करण्यात आलेला आहे. गत वर्षीच्या तुलनेत या वर्षी माहे जुने अखेरपर्यंत १०.०४ कोटी इतकी वाढ झालेली आहे.

वसई-विरार शहर महानगरपालिकेतील मुदतीत मालमत्ता कर भरणा करणाऱ्या मालमत्ता धारकांना मालमत्ता करातून महानगरपालिके मार्फत विशेष सुट जाहीर करण्यात आलेली आहे ती खालीलप्रमाणे:

| सूटचा तपशील | |
|---|---|
| कालावधी | सूटचा दर (सामान्य करात) |
| १ जुलै २०२४ ते ३१ जुलै २०२४ पर्यंत | ३% |

वसई-विरार शहर महानगरपालिका हद्दीतील सर्व नागरिकांना सूचित करण्यात येत आहे कि, सन २०२४-२५ या वित्तीय वर्षाची मालमत्ता कर देयके वितरणाची कार्यवाही सुरु आहे.

मालमत्ता धारकांच्या सोयीसाठी सन २०२४-२५ या वित्तीय वर्षातील मालमत्ता कर देयके पाहण्याची तसेच डाऊनलोड करण्याची सुविधा महानगरपालिकेच्या www.vvcmc.in या सांकेतिक स्थळावर उपलब्ध करण्यात आलेली आहे. नागरिकांना आपले मालमत्ता कर देयक पहावयाचे तसेच मालमत्ता कराचा भरणा करावयाचा असल्यास ऑनलाईन पद्धतीने (गुगल पे, फोन पे, नेट बँकिंग इत्यादी) कर भरणा करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

तरी सर्व मालमत्ता धारकांनी वरील सवलतीचा लाभ घेऊन लवकरात लवकर आपल्या मालमत्ता कराचा भरणा करावा व महानगरपालिकेस सहकार्य करावे.

**मालमत्ता कर विभाग**
**वसई विरार शहर महानगरपालिका**